# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.

## पाणी पुरवठा विभाग

विषय :- अजयनगर ड्रेनेज पंपींग स्टेशन येथील १२० एच पी क्षमतेचे नादुरुस्त सबमर्सिबल पंप व कंट्रोल पॅनल दुरुस्त करणेबाबत.

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील अजय नगर येथील ड्रेनेज पंपींग स्टेशन मध्ये १२० एच पी क्षमतेचे ४ सबमर्सिबल पंप अस्तित्वात आहेत परंतू सदर सबमर्सिबल पंप, पंपाची केबल व त्याचे पॅनल संपूर्ण खराब झालेले असून नादुरुस्त आहे. सदर कारणाने अजयनगर पंपींग स्टेशन येथे येणारे सांडपाणी काटई येथील मलप्रक्रिया केंद्र येथे पंपींग करणेस अडथळा निमार्ण झालेली आहे. या पूर्वी सदर पंपींग स्टेशनचे कोणत्याही प्रकारचे पंप दुरुस्ती काम केलेले नसल्याने सदर पंपाचे रिवाईंडीग, ओव्हरहॉलींग, नादुरुस्त झालेल्या ग्रकेबल्स् व पॅनल बोर्ड दुरुस्ती व नव्याने बसविल्यानंतर पंपींग स्टेशन कार्यान्वित करता येऊ शकेल, सदर काम करणे अत्यंत तातडीचे व आवश्यक आहे.

अजयनगर ड्रेनेज पंपींग स्टेशन येथील १२० एच पी क्षमतेचे नादुरुस्त सबमर्सिबल पंप व कंट्रोल पॅनल दुरुस्त करणेबाबतच्या कामास दिनांक ३०/०८/२०२२ रोजी अन्वये प्रशासकीय व आर्थिक मान्यता प्राप्त झालेली आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १. | अजयनगर ड्रेनेज पंपींग स्टेशन येथील १२० एच पी क्षमतेचे नादुरुस्त सबमर्सिबल पंप व कंट्रोल पॅनल दुरुस्त करणेबाबत | रु. ३३,५०,०३४/- |

शासन आदेश क्र. एमसीओ- २०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४, दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ ब) मधील तरतुदीनुसार निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा. प्रशासक तथा आयुक्त यांना आहेत.

उपरोक्त नमुद अजयनगर ड्रेनेज पंपींग स्टेशन येथील १२० एच पी क्षमतेचे नादुरुस्त सबमर्सिबल पंप व कंट्रोल पॅनल दुरुस्त करणेबाबतच्या कामाची निविदा महा-ई-टेंडर पोर्टलवर प्रसिध्द करणे कामी मंजुरी देणे बाबतचा प्रस्ताव.

ठराव क्रमांक : ३८ दिनांक ०७/१०/२०२२

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका अजयनगर ड्रेनेज पंपींग स्टेशन येथील १२० एच.पी. क्षमतेचे नादुरुस्त सबमर्सिबल पंप व कंट्रोल पॅनल दुरुस्त करणेबाबतचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता व अति. आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. एमसीओ-२०२०/प्रक्र.७१(भाग-२) नवी-१४ दि. ०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, पाणी पुरवठा विभागाकडील अजयनगर ड्रेनेज पंपींग स्टेशन येथील १२० एच.पी. क्षमतेचे नादुरुस्त सबमर्सिबल पंप व कंट्रोल पॅनल दुरुस्त करणेबाबतची निविदा प्रसिध्द करणेस मंजूरी देत आहे.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि. शहर महानगरपालिका, भिवंडी.